# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा. क्र. उमपा/कर विभाग/ यू.१/206/ २३ दि. 26/02/२०२४

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात क्र. 03AO014151800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यवती म्हणुन श्री.रामचंद्र चतरसिंह रावत अशी नोंद आहे.

श्री.रामचंद्र चतरसिंह रावत, रा.राकेश अर्पा. फ्लॅट २०३,मुरबाड रोड, उल्हासनगर–१ यांनी टोकन न. ४१२०२४००००२२५ दिनांक ०३/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये ते स्वत: माजी सैनिक असल्याने शासन निर्णयानुसार त्यांचे नावावर असलेल्या मिळकतीस मालमत्ता करात सवलत देणेबाबत कळविले आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केली आहेत.

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, सैनिक कल्याण विभाग, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे व पालघर यांचेमार्फत न. 1947/ZSWO-12/2020/2948 dt 21 DEC 2023 अन्वये मालमत्ता सूट देणेबाबत जारी करण्यात आलेले पात्रता प्रमाणपत्राची प्रत.
२. वर्ष २०२२-२०२३ अखेर मालमत्ता कराची थकीत देणी नसलेबाबतचे प्रमाणपत्र.
३. माजी सैनिक ओळखपत्र
४. पॅन कार्ड व आधार कार्ड ची छायांकित प्रत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१०१/भाग –२/ का.२८ दिनांक २३/११/२०२० नुसार मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना ( माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातुन सुट) विहीत करण्यात आली आहे.

उक्त योजनेअंतर्गत मालमत्ता कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने खालीलप्रमाणे अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) या योजनेचा लाभ मिळण्यासाठी सदर माजी सैनिक महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे सलग रहिवासी असावा. त्याकरिता त्याने सक्षम प्राधिकाऱ्याकडून अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२) अशा करमाफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने जिल्हयाच्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात क्र. 03AO014151800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्री.रामचंद्र चतरसिंह रावत अशी नोंद असून त्यांनी मालमत्ता करात सुट देणेकामी अधिवास प्रमाणपात्र व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांचेकडील पात्रता प्रमाणपत्र सादर केले आहे.तसेच वर्ष २०२२–२०२३ पर्यंत कराचा भरणा केला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८–अ मधील तरतूदीनुसार मालमत्ता करांत ,पाणीपट्टी,पाणीपुरवठा लाभकर,विशेष साफसफाई कर,सर्वसाधारणकर (अग्निशमन करासह), महानगरपालिका शिक्षणकर,पथकर,या करांचा समावेश आहे.तसेच महानगरपालिका मालमत्ता कराचे बिलात शासकिय शिक्षणकर व रोजगार हमी उपकर,मोठया निवासी जागेवरील कर व वृक्ष कर इ. समाविष्ट आहेत.त्यापैकी,

अ) " शिक्षणकर व रोजगार हमी उपकर " या कराची आकारणी महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अंतर्गत करण्यात येते.

ब) " मोठया निवासी जागेवरील कर " या कराची आकारणी महाराष्ट्र इमारतीवरील ( मोठया निवासी जागांसह ) ( पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ मधील तरतुदीनुसार करण्यात येते.

क) " वृक्ष कर " या कराची आकारणी महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार करण्यात येते.

वरीलप्रमाणे अ,ब,क मध्ये नमुद कर महाराष्ट्र महानगरपालिका अभिनियमातील कलम १२८—अ मधील तरतूदीनुसार मालमत्ता करांत येत नाहीत.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१०१/भाग —२/ का. २८ दिनांक २३/११/२०२० नुसार मा. **बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना ( माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातुन सुट)** अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात क्र. 03AO014151800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता चालू आर्थिक वर्ष २०२३—२०२४ मध्ये शासकिय शिक्षण कर व वृक्ष कर वगळता उर्वरित मालमत्ता करात सूट देवून सुधारित बिल जारी करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१०१/भाग —२/ का.२८ दिनांक २३/११/२०२० नुसार मा. **बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना ( माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातुन सुट)** अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात क्र. 03AO014151800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता चालू आर्थिक वर्ष २०२३—२०२४ मध्ये शासकिय शिक्षण कर व वृक्ष कर वगळता उर्वरित मालमत्ता करात सूट देवून सुधारित बिल जारी करावे.

२७/१२/२४

(प्रियंका राजपुत)
उप—आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:—

१. कोल्ब्रो गृप, नागपुर.
२. श्री.रामचंद्र चतरसिंह रावत,
   रा.राकेश अर्पा. फ्लॅट २०३,मुरबाड रोड,
   उल्हासनगर—१